# ❖ पोलीस क्रीडा स्पर्धा २०१७

44 व्या कोकण परिक्षेत्रिय क्रिडा स्पर्धेचा उद्घाटन समारंभ आज दिनांक 02.11.2017 रोजी सायं.16.00 वा पोलीस मुख्यालय रायगड अलिबाग येथे मोठ्या दिमाखात पार पडला. या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हयाचे व महाराष्ट्र पोलिसांचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणारी रायगड जिल्हयातील प्रसिद्ध क्रिडापटू कुमारी सोनिया हनुमंत मोकल यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. सोनिया हिने नुकत्याच ऑगस्ट 2017 मध्ये अमेरिकेतील लॉस अॅन्जेलिस, कॅलिफोर्निया येथे झालेल्या जागतिक पोलीस क्रिडा स्पर्धेमध्ये रशिया, जपान, नायजेरिया या देशांच्या धावपटूंवर मात करीत जिद्दीने 800 मीटर धावणेच्या स्पर्धेत सुवर्णपदक,  1500 मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्य आणि 3000 मीटर स्टीपल चेस स्पर्धेत रौप्य पदक पटकावून महाराष्ट्र पोलीस दलाचे व रायगड जिल्हयाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल केले आहे. या प्रसंगी सोनिया मोकल यांना रायगड जिल्हा पोलीस दलातर्फे विशेष स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी रायगड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री अनिल पारस्कर, अपर पोलीस अधीक्षक श्री संजयकुमार पाटील, निवृत्त पोलीस उप अधीक्षक श्री राजेंद्र दंडाळे तसेच जिल्हयातील क्रिडा समित्यांचे सर्व सदस्य अधिकारी, कर्मचारी, खेळाडू, पोलीस कुटुंबीय, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.  संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा.पोलीस निरीक्षक श्री. आर.एन.राजे, जनसंपर्क अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय रायगड यांनी केले.


PUMA


रायगड
पोलीस


महाराष्ट्र पोलीस

